504 Scholarship keni

# महाराष्ट्र शासन

सहसंचालक,
उच्च शिक्षण ,मुंबई विभाग , मुंबई
एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, ३ महापालिका मार्ग, मुंबई -४०० ००१
www.jdhemumbai.gov.in Tel&Fax No. 022 22656600, 22691528

e-mail : jd@jdhemumbai.gov.in admin@jdhemumbai.gov.in

क्र.सहस/मुंवि/३-लेखा / MIS /२०१३-१४/ 2996 दिनांक : 19/11/2013

प्रति,
प्राचार्य
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत,
विनाअनुदानीत महाविद्यालये,
मुंबई शहर, मुंबई ऊपनगर,

विषय :- उच्च शिक्षण संचालनालयासाठी विकसित केलेल्या एम.आय.एस प्रणाली मधे ऑनलाईन माहिती भरण्याबाबत

संदर्भ :- उशिसं / २०१३ / एमआयएस / ७९६८, दिनांक :- १/११/२०१३.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी सर्व संलग्नित महाविद्यालये यांच्यासाठी ऑनलाईन माहिती व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर प्रणालीमध्ये महाविद्यालयांची माहिती संकलनासाठी तयार केलेल्या ९ विवरणपत्रानुसार आज्ञावली विकसित करुन **mis.dhepune.info/login.aspx** या युआरएलने कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर प्रणालीच्या माध्यमातून राज्यातील उच्च शिक्षण विषयक अतिशय महत्वाची माहिती संकलित केली जाणार आहे. व ही माहिती महाराष्ट्र शासनाच्या स्टेट डेटा सेंटर मध्ये होस्टिंग करण्याची कार्यवाही संचालनालयाच्या पातळीवर चालू आहे.

सदरबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांची दिनांक ११.११.२०१३ रोजी विद्यापीठ विद्यार्थी भवन येथे एकत्रीत कार्याशाळा घेण्यात आली होती. परंतु सदर कार्याशाळेस फारच कमी महाविद्यालयांचे प्रतिनीधी उपस्थित होते . तसेच याबाबत मुंबई विद्यापीठाने दिनांक ६.११.२०१३ रोजी परिपत्रक प्रसिध्द करुनही महाविद्यालयांकडून उपरोक्त प्रणाली मध्ये अदयाप माहिती अपलोड केलेली नाही. तरी सदर माहिती प्रस्तूत प्रणाली मध्ये दिनांक २७.११.२०१३ पर्यंत सादर करावयाची आसल्याने याबाबत मार्गदर्शन करण्याकरिता दिनांक **२१.११.२०१३ रोजी दुपारी 1.०० वाजता जय हिंद महाविद्यालय, ए, रोड चर्चगेट मुंबई ४०००२०,** येथे कार्याशाळा आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर कार्याशाळेस आपल्या महाविद्यालयांच्या संबंधीत कर्मचाऱ्यास उपस्थित राहण्यास सूचना देण्यात याव्यात.

Hwane
सहसंचालक,
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई.

F:\backup\Documents\ scholarship1